# ऑटोलाइन इंडस्ट्रिज लिमिटेड AUTOLINE

सीआयएन : एल३४३००पीएन१९९६पीएलसी१०४५१०
**नोंदणीकृत कार्यालय** : सर्व्हे नं. ३१३/३१४, ३२० - ३२३, नाणेकरवाडी, चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ | **फोन** : +९१ २१३५ ६६४८६५/६
**फॅक्स** : +९१ २१३५ ६६४८६४ | **वेबसाइट** : www.autolineind.com | **ईमेल** : investorservices@autolineind.com

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, दि. ८ ऑगस्ट २०१५ च्या सूचनेत नमूद करण्यात आलेले कामकाज पार पाडण्यासाठी ऑटोलाईन इंडस्ट्रीज लिमिटेड (कंपनी) ची १९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. २९ सप्टेंबर, २०१५ रोजी दु. २.३० वाजता स. नं. २९१-२९५, नाणेकरवाडी, चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ येथे आयोजित करण्यात आली आहे. सभेच्या सूचनेसह एकत्रित वित्तीय वर्ष २०१४-१५ चा कंपनीचा वार्षिक अहवाल ज्यांचे इ-मेल कंपनीच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंटकडे उपलब्ध आहेत अशांना इ-मेलद्वारे आणि इतर सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर दि. ५ सप्टेंबर, २०१५ रोजी पाठविण्यात आलेले आहेत. कंपनीचा वार्षिक अहवाल आणि सूचना कंपनीच्या www.autolineind.com या वेबसाईटवर सुद्धा उपलब्ध आहे. कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९१ व त्या अंतर्गत लागू नियमांनुसार आणि स्टॉक एक्स्चेंजच्या सूचिबद्धता कराराच्या नियम १६ नुसार शनिवार, दि. २६ सप्टेंबर, २०१५ ते मंगळवार, दि. २९ सप्टेंबर, २०१५ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत कंपनीचे सदस्य नोंदपुस्तक व भाग हस्तांतरण पुस्तक बंद ठेवण्यात येतील.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ व त्याअंतर्गत लागू नियम (सुधारित) आणि स्टॉक एक्स्चेंजच्या कराराच्या नियम ३५ब नुसार कंपनीद्वारे त्यांच्या सभासदांना सभेच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्यासाठी सभेच्या ठिकाणापेक्षा वेगळ्या ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक स्वरुपात मतदान (रिमोट इ-वोटिंग) करण्याची सुविधा नॅशनल सिक्युरिटीज् डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) च्या माध्यमाद्वारे देण्यात आलेली आहे.

सर्व सभासदांना माहिती देण्यात येते की, रिमोट इ-वोटिंगचा कालावधी शनिवार, दि. २६ सप्टेंबर, २०१५ रोजी सकाळी ९ वा. सुरू होऊन सोमवार दि. २८ सप्टेंबर, २०१५ रोजी संध्याकाळी ५ वा. बंद होईल. या कालावधीच्या दरम्यान दि. २२ सप्टेंबर, २०१५ रोजी नोंदणी असलेले (कट ऑफ डेट) वास्तविक स्वरुपातील किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील (डिमॅट) कंपनीचे भागधारक, इ-वोटिंगद्वारे करू शकतील. रिमोट इ-वोटिंग दि. २८ सप्टेंबर, २०१५ रोजी संध्याकाळी ५.०० नंतर बंद करण्यात येईल आणि त्यानंतर सभासदांना इ-वोटिंगद्वारे मतदान करता येणार नाही. एखाद्या ठरावावर भागधारकाने एकदा मत दिले की त्याला ते नंतर बदलण्याची किंवा पुन्हा मत देण्याची परवानगी देण्यात येणार नाही. सूचना पाठविली गेल्यानंतर कोणीही व्यक्ती कंपनीचे भाग प्राप्त करून सभासद झाली असल्यास व नोंदणी तारखेस (कट ऑफ डेट) भाग धारण करत असेल तर ती व्यक्ती एनएसडीएलला evoting@nsdl.co.in वर विनंती पाठवून लॉगइन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकते. तथापि, जर त्या व्यक्तीची एनएसडीएलकडे इ-वोटिंगसाठी आधीच नोंदणी असेल तर ती व्यक्ती तिचा आधीचा अस्तित्वातील युजर आयडी व पासवर्ड वापरून मतदान करू शकते. ज्या मतदारांनी रिमोट इ-वोटिंगद्वारे मतदान केलेले नसेल आणि जर ते सभासद सभेला उपस्थित असल्यास त्यांच्यासाठी सभेच्या ठिकाणी मतदानपत्राद्वारे मत देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल. ज्या सभासदांनी त्यांचे मत सभेच्या पूर्वी इ-वोटिंगद्वारे दिलेले असेल तेही सभेस उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना सभेत मतदानाचा हक्क असणार नाही. भागधारकांचा मतदानाचा हक्क नोंदणी दि. २२ सप्टेंबर, २०१५ रोजी कंपनीच्या सभासद नोंदवहीमध्ये अथवा डिपॉझिटरीने ठेवलेल्या भागांच्या लाभधारक मालकांच्या नोंदवहीमध्ये नोंद असलेल्या प्रमाणात असेल.

कंपनीने मे. कंज ॲण्ड असोसिएटस्चे भागीदार श्री. सुनिल नानल, प्रॅक्टिसिंग कंपनी सचिव यांना स्क्रुटिनायझर नियुक्त केले आहे. इ-वोटिंगबाबत काही प्रश्न/तक्रारी असल्यास आपण https://www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोडस् विभागात उपलब्ध असलेल्या सभासदांचे नेहमी विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज्) आणि इलेक्ट्रॉनिक वोटिंग युजर मॅन्युअल यांचा संदर्भ घेऊ शकता किंवा श्री. राजीव रंजन, सहाय्यक व्यवस्थापक, एनएसडीएल, ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, ४था व ५वा मजला, कमला मिल्स कंपाऊंड, लोअर परळ, मुंबई, महाराष्ट्र ४०००१३ यांच्याशी evoting@nsdl.co.in वर किंवा (०२२) २४९९४६००/(०२२) २४९९४७३८ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधू शकता, जे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून करावयाच्या मतदानाशी संबंधित तक्रारींकडे लक्ष पुरवतील.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**ऑटोलाइन इंडस्ट्रिज लिमिटेडकरिता**
सही/-
**आशिष गुप्ता**
कंपनी सचिव

**ठिकाण** : पुणे
**दिनांक** : सप्टेंबर ७, २०१५

**सूचना** : वरील सूचना ही मूळ इंग्रजी सूचनेचे स्वैर मराठी भाषांतर असून संदर्भ स्पष्टीकरणासाठी व कायदेशीर बाबींकरीता मूळ इंग्रजी सूचना ग्राह्य धरण्यात येईल.